# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**<u>मानधन तत्त्वावरील "बायोमेडीकल इंजिनियर" जागांसाठी भरती प्रक्रिया</u>**

# <u>जाहिरात</u>

## थेट मुलाखत (Walk in Interview)

नाशिक महानगर पालिका नाशिक सार्वजनिक आरोग्य विभागा अंतर्गत मनपाच्या रुग्णालयातील यंत्र सामुग्री देखभाल व दुरुस्ती करीता 'बायामेडीकल इंजिनियर' या पदाकरीता प्रथम ०६ महिने कालावधी करीता मानधनावर भरती करणेकामी थेट मुलाखत (Walk in Interview) मा. अति. आयुक्त (सेवा) यांचे दालनात राजीव गांधी भवन मुख्यालय, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे खालील नमुद दिनांकास स. ११.०० ते दु. १२.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आले आहे. सर्व संबंधीत उमेदवारांनी किमान शैक्षणिक अहर्ता धारण करीत असल्यास आवश्यक त्या सर्व शैक्षणिक कागदपत्रांसह नाशिक महानगरपालिकेच्या मुख्यालयात उपस्थित रहावे.

**<u>भरती करावयाची पदांची माहीती</u>**

| अ. नं. | पदाचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन | मुलाखत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | बायोमेडीकल इंजिनियर | २ | बॅचलर इन बायोमेडीकल इंजिनियरिंग अथवा बी ई. बायोमेडिकल इंजिनियरिंग | र.रु. ३०,०००/- | दि.०९/११/२०२१ |

- सदर पदेही तात्पुरत्या स्वरुपाचे असल्याने नाशिक महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेवर कायम करण्याचा हक्क राहणार नाही.
- अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेल्या शैक्षणिक कागदपत्रे रुजु होतांना मुळ कागदपत्रे सोबत आणने अनिवार्य आहे.
- उमेदवारांनी पासपोर्ट साईझ २ फोटो, जन्मतारखेकरीता शाळा सोडल्याचा दाखला, फोटो आयडी करीता मतदान ओळखपत्र किंवा आयडीकार्ड शैक्षणिक अर्हता कामी शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, अनुभव प्रमाणपत्रआवश्यक राहील.
- उमेदवारांनी कोणत्याही प्रकारे राजकिय दबाव आणल्यास नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
- जाहीरात मध्ये बदल करणे, भरती प्रक्रिया स्थगित करणे, रद्द करणे, प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त नाशिक महानगरपालिका नाशिक यांनी राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. तसेच त्याच्याविरोधात कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
- सदरच्या भरती प्रक्रियेमध्ये बदल करणे व अनुषंगिक इतर सर्व बाबींचे अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवलेले आहे.

Sd/-
आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक.